# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/११/२०२५ (सोमवार )**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०२/११/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, यांच्या आदेशाने सहा.पोलीस निरीक्षक, श्री स्नेहल राउत, प्रभारी अधिकारी, अरोली हे अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करणे कामी पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा महादुला फाटा येथे नाकाबंदी केली असता भंडारा कडुन येणारे वाहन क्र १) एम.एच ४० सी.एम ९४५२ २) एम.एच. ४० बी एफ ९१३० ३) एम. एच ४० सी.टी ८६३४ च्या चालकांना त्याचें ताब्यातील वाहन रोडच्या बाजुला थांबायला इशारा केला असता ते न थांबता पळुन गेले. त्यानंतर ट्रक क्र एम.एच ४० बी.एफ ००१० हा येताना दिसला पोलसांनी शिताफिने ट्रक थांबवुन चालक **सुरेंद्र ज्ञानेश्वर मुंडा, वय ५५ वर्ष, रा. मॉ शारदा नगर, खरबी, जि. नागपुर,** अशी माहीती प्राप्त झाली. वाहनामध्ये ८ ब्रास रेती मिळुन आली. नमुद वाहनात परवान्यापेक्षा जास्त रेती भरलेली होती. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक क्र एम.एच ४० बी.एफ ००१० किंमती ४०,००,०००/— रूपये आणि ८ ब्रास रेती किंमती ४०,००० /— रूपये असा एकुण ४०,४०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

नमुद वाहन क्र १) एम. एच ४० सी. एम ९४५२ २) एम. एच. ४० बी. एफ. ९१३० ३) एम.एच ४० सी.टी. ८६३४ चे चालक आणि मालक, तसेच ट्रक क्र एम.एच ४० बी. एफ ००१० चा चालक नामे सुरेंद्र ज्ञानेश्वर मुंडा, वय ५५ वर्ष, रा. माॅ शारदा नगर, खरबी, जि. नागपुर आणि वाहन मालक याच्या विरूध्द पोस्टे मौदा येथे  कलम ३०३(२),३(५)  भा.न्या. सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज **अधिनियम, कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि.सह कलम २३९,१७७ मोवाका अन्वये अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक** सुरेंद्र ज्ञानेश्वर मुंडा **याला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद<br>नागपुर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन वरठी, जि भंडारा** :— मा. श्री संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपुर परीक्षेत्र यांच्या आदेशाने आणि मा. श्री. हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०२/११/२०२५ रोजी सहा. पोलीस निरीक्षक, श्री स्नेहल राउत, प्रभारी अधिकारी, अरोली हे अवैध रेती वाहतुक करणाऱ्यांवर क्राॅस रेड कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन वरठी जि. भंडारा येथे पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, एकलारी ते नेरी रोड ने अवैधरित्या रेतीची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नमुद रोडने पेट्रोलींग केली  १० चक्का ट्रक क्रमांक एम.एच ३६ ए.ए. २२४१ हा येताना दिसला. पोलसांनी ट्रक थांबवुन पाहणी केली असता त्यात रेती होती. **चालक नामे अमित भोजीराम शेंडे, वय २६ वर्ष, रा. मालीपार,ता. जि. नागपुर आणि वाहन मालक चे नाव मनिष दिलीप मेहर, रा भंडारा हा असल्याची माहीती प्राप्त झाली**. नमुद वाहन चालक आरोपीला रेती वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही पनावाना नसल्याचे सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष एम.एच ३६ ए.ए.२२४१ किंमती २५,००,०००/— रूपये आणि ६ ब्रास  रेती किंमती ३६,००० /— रूपये असा एकुण २५,३६,०००/— रूपयेचा माल जप्त करण्यात आला.

नमुद वाहन चालक आणि वाहन मालक याच्या विरूध्द पोस्टे वरठी, जि. भंडारा येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधि.सह कलम २३९,१७७ मोवाका अन्वये अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील रेकॉर्डवरील गुन्हेगार स्नेहल रमेश मानवटकर याला नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, सावनेर यांनी स्नेहल रमेश मानवटकर ,वय २६ वर्षे, रा. डोंगरे ले आउट, कळमेश्वर जि नागपुर याला ६ महीन्यांकरीता हद्दपार केले**

नमुद आरोपीवर दुखापतीचे तसेच अवैध दारू बाबत अनेक गुन्हे दाखल असुन त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी पोलीसांनी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. सदर आरोपी असे गुन्हे करण्याच्या सवईचा असल्याने तो अशा प्रकारचे गुन्हे करून सामान्य जनतेच्या मनात दहशत पसरवितो तसेच त्याच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे सदर आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम कलम ५६ (१) (ब) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव पोलीसांनी उपविभागिय दंडाधिकारी सावनेर यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून **आरोपी नामे स्नेहल रमेश मानवटकर ,वय २६ वर्षे, रा. डोंगरे ले आउट, कळमेश्वर जि नागपुर. याला ६ महीन्यांकरीता नागपुर शहर आणि नागपुर ग्रामीण येथुन हद्दपार केले आहे.**

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती दयावी.



स्नेहल रमेश मानवटकर

# अवैधरित्या देशी आणि मोहफुलाची दारू, विदेशी दारू बाळगणाऱ्या / विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई ११ गुन्हे नोंद एकुण ५६,८५५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०३/११/२०२५** रोजी दारूबंदी कायद्या अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू ,विदेशी दारू असा एकुण ५६,८५५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे दिपकसिंग अंनतसिंग भोंड, वय ४८ वर्ष, रा. सायखोड, कोंढाळी आणि नरेश भिमरावजी सोनबरसे वय ४२ वर्ष रा. सायखोड कोंढाळी **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे  आरोपी नामे १) घनशाम कुडलींकराव तांदळे, रा. रेवतकर लेआउट काटोल २) गजानन रामदासजी शिरसागर रा. मेढेपठार ता.काटोल यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. तसेच दोन महीला अरोपी यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे ताराचंद नत्थु पाटील, वय ५० वर्ष, रा. पचखेडी याचेवर १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन कुही**  येथे महीला आरोपीवर १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी नामे १. विलास लक्ष्मण तरारे, वय ४३ वर्षे, २. अर्जुन धोडबा तरारे दोन्ही रा. पंचाळा बु त रामटेक यांचेवर १ **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी १. नारायणओमकार सोनवाने, वय ४० वर्ष, रा.वार्ड क्र. १२ जाामा मस्जिद जवळ ता सावनेर, २. ज्ञानेश्वर उर्फ नाना शालिकराम उईके, वय ४० वर्षे, रा. बाभुळखेडा, ता. कामठी, जि. नागपुर ३. संजय दिनकर खडतकर, वय ४१ वर्षे, रा. वार्ड नं. ५ पाटनसावंगी ता. सावनेर, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. तसेच आरोपी नामे १) नंदकिशोर गुनाजी डांगे, वय ४० वर्षे, राह. वार्ड नं. ०२ बस स्टॉप जवळ तेलकामठी २) नितीन देशमुख राह. तेलकामठी,३) राजु कश्यप रा. सावनेर यांचेवर १ गुन्हा नोंद आहे. अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ११ गुन्हे दाखल केले आहे.**

# रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०२/११/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०३/११/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, पोलीस उपधिक्षक गृह (प्रभारी ) यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन कोंढाळी चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होते.



**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**